# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 26 / 10 / 2021 (मंगळवार)


---

### शिवम बारवर सावनेर पोलिसांची कारवाई

मा. पोलीस अधीक्षक श्री मगर साहेब, मा.अपर पोलीस अधीक्षक श्री राहुल माकणीकर साहेब उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर उपविभाग श्री अशोक सरंबळकर साहेब यांनी पोलीस स्टेशन हददीत अवैध धंदयावर कारवाई करुन कोणत्याही प्रकारचे अवैध धंदे चालणार नाहीत याबाबत सुनचा दिल्याने त्याप्रमाणे त्यांचे मार्गदर्शनाखाली मा.पोलीस निरीक्षक श्री मुळुक साहेब यांना मिळालेल्या गुप्त बातमीनुसार धापेवाडा शिवार ता.कळमेश्वर येथील शिवम बार ॲन्ड रेस्टांरट येथील बार मालक व चालक हे बारमध्ये अवैधरित्या डान्सबार चालवत आहे अशी माहिती मिळाल्याने त्याप्रमाणे त्यांनी सहा.पोलीस निरीक्षक शिवाजी नागवे, सहा.पोलीस निरीक्षक सतिष पाटील, परि.पोलीस उपनिरीक्षक प्रियंका गेडाम, स.फौ. राजेद्र यादव, पो.हवा संजय शिंदे, पोना माणिक शेरे, पोना सुरेंद्र वासनिक, मपोना मनिषा बंडीवार, पो.का विशाल इंगोले यांचे पथकतयार करुन दिनांक 24/10/2021 रोजी 23.30 वा. चे शिवम बार ॲन्ड रेस्टारंट धापेवाडा या ठिकाणी कारवाई करुन मॅनेजर 1.मनिष उर्फ विक्की प्रेम नारायण जैस्वाल वय ३२ व र्ा रा. फेंडस कॉलणी प्लॉट नंबर अे १७ वास्तु शिल्पनगर नागपुर तसेच बार मध्ये कामकरणारे वेटर २ राहुल विकास रामटेक वय ३० व र्ा रा.सालाई खुर्दता.मोहाडी जि.भंडारा हल्लीमु. दिनेश कोहळे रा.धापेवाडा यांचे घरी किरायाने ३ टिकेद्र वधारावसावजी वय ३२ रा. रामकुंडता. चक्रा जि.चक्रा राज्य झारखंड हल्ली मु.दिनेश कोहळे रा.धापेवाडा यांचे घरी किरायाने ४ रोहित कुमार सुरेश शाहु वय २८ व र्ा, रा. रामकुंडता, चक्रा जि. चक्रा राज्य झारखंड हल्ली मु. दिनेश कोहळे रा. धापेवाडा यांचे घरी किरायाने यांना ताब्यात घेण्यात आले तसेच सदर मालक सदर ठिकाणी मिळुन आले नाहीत.

तसेच आकेस्ट्रा स्टेजवरील पुरुष कलाकार १. पराग दिपकसाळसकर वय ४० व र्ा, रा.योगी नगर लाठी रोड सनफलॉवर हाईट अमरेली गुजरात २. मासुन अब्बास मोहम्मद वय ५३ व र्ा, रा. रुम नंबर १५१ अब्बासीहौस, पाईसाररोड, पाईसार रस्त्या मागे पाईसारकांदीवली वेस्ट मुंबई ३. प्रविण नारायण मोरे वय ५१ व र्ा, रा.टागोर नगर विक्रोळी मुंबई ईस्ट ४. शेख नसीर वल्द नफीस अहमद वय ५० व र्ा रा. खालीद खजुरी सोसायटी रुम नंबर २०४ सबेरा थिटयर मागे मालवणी मालाड वेस्ट मुंबई ९५ हल्ली सर्व मु. दिनेश कोहळे रा.धापेवाडा यांचे घरी किरायाने यांचे कडे तसेच सदर हॉल मध्ये आकेस्ट्राचे संगिताचे ताला वर बिभत्स हाव भांव अंग विक्षेपकरुन गैर शिस्तवर्तन करणा—या ५ बारबालांकडे परि.पोलीस उपनिरीक्षक गेडाम मॅडम यांनी चौकशी करुन ताब्यात घेवुन त्यांना व गायकांना सुचनापत्र देवुन सोडुन दिले.

सदर बार मधुन १००० / रुपयेत्यात ५०० रुपयेदराच्या २ नोटा, ८५००/ रुपयेत्यात ५० रुपयेदराच्या १७० नोटा,६०००/ रु किंचे एक ढोलक,४०००/ रु कि.चे दोन नग टीम बाली, ८५०००/.रु किं. चे कि बोर्ड /कॅशीओ, ४०००/ रु. कि.चे दोन माईकजु.वा.कि.अं,६०००/रु कि.चा एक काळे,५०००/ रु कि.चा एक काळे, ८०००/रु कि.चे दोन काळया रंगाचे स्पीकार बॉक्स,००.००कि.चे पैशात रुपांतरहोणारे डमी चलनाचे १४९ बंडल प्रत्येक बंडल मध्ये १०० नोटाज्यावर ५० अंक लिहिलेला असा एकुण १,२७,५००/. रुपयाचे मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.

त्यानुसार पोलीस नाईक अतुल खोडणकर यांच्या लेखी रिपोर्टावरुन अप क्रमांक 662/2021 भादवि कलम २९४,११४,३४ सह महाराष्ट्र हॉटेल, उपहारगृहे आणि मदयपान कक्ष (बाररुम) यामधील अश्लील नृत्यावर प्रतिबंध घालण्याबाबत व (त्यामध्ये कामकरणा—या) महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम २०१६ अधिनियम क्र. १२ कलम ३,४,८ (१),(२) (४) महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३१अ,अ,३३अ चे उल्लंघन प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास पोलीस निरीक्षक मुळुक यांच्या मार्गदर्शना खाली सहा.पोलीस निरीक्षक शिवाजी नागवे हे करीत आहेत.

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक
## पोलिस स्टेशन मौदा ची कारवाई

दिनांक 24/10/2021 रोजी पो.स्टे. मौदा ला मुख्बीरव्दारे खबर मिळाली की, भंडारा कडून नागपूर कडे दोन पांढऱ्या रंगाच्या बोलेरो पिकअप वाहनामध्ये काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन मौदा पोलीस पथकाने तात्काळ माथनी टोल नाका येथे जावून नाकाबंदी करुन एम. एच.–36/ एए–2544 क्रमांकाच्या बोलेरो पिकअप गाडी व एम. एच.–36/ एए–1985 क्रमांकाच्या बोलेरो पिकअप गाडी ला थांबवुन तपासले असता सदर वाहनात आरोपी नामे– 1. चांद अमर उताने, वय 23 वर्ष, रा. लावेक्ष्वर ता.जि.भंडारा व 2. राजेंद्र रवि राऊत वय 29 वर्ष, रा. पांजरा ता.मोहाडी जि.भंडारा यांच्या ताब्यातुन एकुण दोन्ही वाहनातील 10(बैल) जनावरे कि. 1,50,000/–रू. ची निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आले. दोन्ही वाहन व गोवंशासह एकुण किंमती 11,50,000/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस शिपाई श्री. संजय बरोडिया, पो.स्टे. मौदा यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे वरील आरोपीविरुध्द कलम 11 कलम 11(1)(ड) प्रा.नि.वाग.प्र.अधि.1960 सहकलम 5(अ),9 महाराष्ट्र प्राणी रक्षण अधिनियम काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री सतिश सोनेकर हे करीत आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक श्री राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन मौदाचे ठाणेदार पोलीस निरीक्षक श्री हेमंत खराबे यांचे नेतृत्वात सपोनि श्री सतिश सोनेकर, पोलीस शिपाई संजय बरोडिया, तुशार कुडमते, केशव फड्ड यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

(सदर बातमीचा फोटो सोबत जोडला आहे.)

## चोरी

1) पो.स्टे. बोरी :– अंतर्गत मौजा हळदगाव ता. हिंगणा जि. नागपूर येथे दिनांक 29/09/2021 ते दिनांक 25/10/2021 चे 22.00 वा. पावेतो फिर्यादी नामे– राजेन्द्र मधुकर गोटेकर वय 42 वर्ष, रा. लोधी पांजरी यांची हळदगाव येथे शेती आहे. फिर्यादी यांचे वडीलांनी सुरेश प्रभुजी सांभारे यांना काही शेती विकली आहे. शेती अखंड असल्याने वाद सुरु आहे. फिर्यादी यांची आई शेतीचे काम पाहत असते व फिर्यादी हे अधुन मधून शेतात जात असतात. दि. 30/09/21 रोजी फिर्यादीची आई सांगु लागली की, "दि. 29.09.21 रोजी दुपारी शेतात गेली असता शेतात असलेले जुन पक्के टिनाचे शेड हे उघडे दिसले व पक्के शेडचे कवेलू फोडून ठेवले आहे. पक्के शेडमध्ये ठेवलेले 8 स्प्रिंकल, नागर वखर, डवरे, फवारे व इतर साहित्य हे दिसत नाही" असे सांगीतले. त्या दिवशी रात्र झालेली असल्याने फिर्यादी हे दुस–या दिवशी दि. 01/10/2021 रोजी शेतात जावून पाहणी केली असता आईने सांगीतल्याप्रमाणे घडलेले दिसले व पक्के शेडमध्ये ठेवलेले 29 प्लास्टीकचे पाईप बाजुला पडलेले होते व शेतातील 9 ऐकरातील तुरीचा उभ्या पिकावरती किटक नाशक औषधाची फवारनी करुन अंदाजे 1,00,000/– रु. चे नुकसान करण्यात आले आहे व इतर साहित्य अंदाजे 50,000/–रु. चे चोरुन नेले आहे असा एकुण कि 1,50,000/–रु. चे नुकसान केले आहे. फिर्यादी यांचा वाद सुरेश प्रभुजी सांभारे यांचेसोबत पुर्वीपासुन सुरु असल्याने तसेच फिर्यादीचे शेतीलगत त्यांची शेती असल्याने त्यांचावर दाट संशय आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 380, 461, 427 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार असलम नौरंगाबादे मो.क्रं. 8668816049 हे करीत आहे.

2) पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 20 कि.मी. अंतरावरील म्हालगाव मौदा जि नागपुर येथे दिनांक 24/10/2021 चे 07.00 दरम्यान अज्ञात आरोपीने मंदीराचे दानपेटीतील अंदाजे 15,000/–रू. चोरी करून नेले असे फिर्यादीचे रिपोर्टवरून सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– रोशन नारायन टिचकुले वय 56 वर्ष रा. श्याम फार्म हाउस गुमथाळा जि नगपुर यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार काळे मा.क्र. 9822549695 हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

पो.स्टे. खापा :– अंतर्गत 04 कि.मी. अंतरावरील खापा सावनेर जाणरा रोड मौजा कोदेगााव शिवार येथे दिनांक 23/10/2021 चे 19:00 वा. दरम्यान आरोपी नामे– घनश्याम गणेश चिचघरे, वय 23 वर्ष, रा. बगडगंज, ता. नागपुर याने त्याच्या ताब्यातील एमएच– 31/ एफएम– 1767 क्रमांकाची ॲक्टीव्हा गाडीने आपल्या गाडीवर श्रीमती बेबीबाई भाउ वाकोडीकर (मृतक), वय 72 रा. वाकोडी हिला डबल सिट बसवुन जात असतांना टर्निंग वर रेतीवरून त्याची गाडी स्लीप होवुन खाली पडल्याने श्रीमती बेबीबाई भाउ वाकोडीकर यांच्या डोक्याला गंभीर मार लागुन त्या जखमी झाल्या. त्यांना उपचाराकरीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे नेले असता उपचारा दरम्यान दि 24/10/2021 चे 11.50 वा. मरण पावले मेडीकल पोलीस बुथ वरून कागदपत्र प्राप्त झाल्यावरून सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी सर तर्फ पोलिस हवालदार राजेश माकडे मेडीकल पोलीस बुथ नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो. स्टे. खापा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री चिश्तिया मो.नं. 8805048777 हे करीत आहे.

## गळफास लावून मृत्यु

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत वार्ड क्र. 3, कांद्री (वस्ती) रामटेक येथे दिनांक 25/10/2021 चे 10:00 वा. नंतर येथे रोशन विलास धुर्वे (मृतक), वय 28 वर्षे रा. वार्ड नं.3 कांद्री (वस्ती) त. रामटेक हा माघील सहा महिण्यापासुन डोक्यात फरक पडल्यासारखा करीत असल्याने. त्याचा उपचार नागपुर येथे सुरू होता. त्याने बेडरूम मध्ये पंख्याच्या कडीला दुपट्याच्या सहाय्याने गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– ग.भा. देवकी विलास धुर्वे वय 50 वर्षे रा. वार्ड नं. 3 कांद्री (वस्ती) त. रामटेक यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. रामटेक येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोना विलास केन्द्रे मो. नं. 9518904494 हे करीत आहे.

## जबरी संभोग

पो.स्टे. नरखेड :– दिनांक 01/02/2021 चे 14:30 वा. ते दिनांक 09/03/2021 चे 23:00 वा. पावेतो फिर्यादी/पीडिता हिचेवर फेब्रवारी 2021 मध्ये आरोपी क्र. 1) हर्षल सुरेंद्र चवडे, वय 24 वर्ष, रा. खरसोली ता.नरखेड याने पीडिताचे राहते घरात जावून तिचे सोबत बळजबरीने शारीरिक संभोग केला. तसेच दि. 08/03/2021 रोजी आरोपी क्र 2) शुभम बंडुजी राउत वय 21 वर्ष रा. मन्नातखेडी ता.नरखेड याने पीडितेस शेतातील समाधी जवळ नेवून बळजबरीने शारीरिक संभोग केला व त्याबाबत कोणाला माहिती दिल्यास मारण्याची धमकी दिली. अशा पीडितेच्या पुरवणी बयानावरून पोलीस स्टेशन बेनोडा अमरावती (ग्रामीण) येथुन अप क्र. 282/2021 कलम 376(3),506,450 भा द वी सहकलम 4, 6 पोस्को याप्रमाणे दाखल आहे. सदर गुन्हयातील घटनास्थळ हे नरखेड पोलीस स्टेशन नागपुर (ग्रामीण) हद्दीतील असल्याने या गुन्ह्याचे कागदपत्रे पोलीस अधिक्षक कार्यालय अमरावती (ग्रामीण) येथुन टपालाने पोलीस अधीक्षक कार्यालय नागपुर (ग्रामीण) येथे प्राप्त झाल्याने सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम 376 (3), 506, 450 भादवि. सहकलम 4, 6 पोस्को कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि कोलते मो.क्र. 8080955589 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर